JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# बौद्धिक संपदा अधिकार आणि त्याचे प्रकार यांचा संकल्पनात्मक अभ्यास

**मोहन मधुकरराव घुगे**
संशोधक विद्यार्थी
मार्गदर्शक डॉ.अरुण मुकुंदराव शेळके
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अकोला

**प्रस्तावना :**

मनुष्य हा बुद्धिजीवी प्राणी आहे. परमेश्वराने मानवाला बुद्धीची देणगी देऊन सर्व प्राणीमात्रात सर्वश्रेष्ठ ठरविले आहे. मनुष्य हा बुद्धीचा वापर करून नवनवीन संशोधनाद्वारे आपले जीवनमान दिवसेंदिवस अत्याधिक सुकर बनवीत आहे. मानवी समूहात काही लोक सर्जनशील वृत्तीचे असतात. त्याच्या ठायी सर्जनशीलता असते. या सर्जनशीलतेतूनच नवनवीन शोध लावून ते या शोधांचा संपूर्ण मानव जातीला उपभोग घेण्याची संधी उपलब्ध करून देत असतात. परंतु असे शोध लावण्यात त्यांनी आपली बुद्धी, वेळ, श्रम आणि पैसा खर्ची घातला असतो. त्यामुळे अशा शोधकर्त्यांना त्यांच्या कार्याच्या श्रेयाबरोबरच योग्य तो आर्थिक मोबदला मिळाला पाहिजे, तसेच त्यांच्या शोधाचा दुरुपयोग होता कामा नये. या विचारातून बौद्धिक संपदा हक्क ही संकल्पना उदयास आली.

आजचे युग हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे युग आहे. इंटरनेटच्या माध्यमातून आपल्याला कोणत्याही प्रकारची माहिती मिळविता येते. मनुष्य हा बुद्धिमान प्राणी आहे. निसर्गाने दिलेले हे वरदान आहे. सर्वसाधारणपणे या जगात भौतिक व अभौतिक अशा दोन प्रकारची संपत्ती आहे. भौतिक संपत्ती म्हणजे डोळ्यासमोर दिसणाऱ्या वस्तू उदाहरण इमारत, वाहन इत्यादी किंवा स्थावर व जंगम संपत्ती ही दृश्य स्वरूपाची संपत्ती असते तर अभौतिक संपत्ती म्हणजे अदृश्य संपत्ती ही डोळ्याने दिसत नाही. ती एखाद्या नवनिर्मिती करणाऱ्या व्यक्तीने आपल्या बुद्धी व कल्पकतेच्या जोरावर निर्माण केलेली असते. भौतिक संपत्तीची खरेदी विक्री करता येते. ती एखाद्या व्यक्तीच्या नावाने सुद्धा करता येते. याप्रमाणेच मनुष्याच्या बौद्धिक परिश्रम किंवा त्याच्या सर्जनशील क्षमतेमुळे निर्माण होणारी संपत्ती यावर त्या व्यक्तीचा अधिकार असावा या विचारातून बौद्धिक संपदा अधिकार याची निर्मिती झाली. तसेच या अधिकाराला कायद्याचे स्वरूप प्राप्त झाले आणि आता जगात ते सर्व मान्य झाले आहेत.

प्रस्तुत लेखात आपण बौद्धिक संपदा अधिकार म्हणजे काय? त्याचे स्वरूप आणि प्रकार यावर संक्षिप्त प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाचा उद्देश :–**
प्रस्तुत संशोधनाचा उद्देश खालील प्रमाणे
१) बौद्धिक संपदा अधिकार म्हणजे काय? त्याचा अभ्यास करणे.
२) बौद्धिक संपदा अधिकाराचे स्वरूप समजून घेणे.
३) बौद्धिक संपदा अधिकाराचे प्रकार अभ्यासणे.

**संशोधनाचे गृहीतके**
प्रस्तुत संशोधनाचे गृहीतके उद्देश खालील प्रमाणे
१) बौद्धिक संपदाच्या हक्कामुळे नवनवीन शोध, कलाकृती निर्मितीस प्रोत्साहन मिळत आहे.
२) बौद्धिक संपदा अधिकारांमुळे लेखकांना, कलाकारांना आर्थिक लाभ मिळविता येत आहे.
३) बौद्धिक संपदा अधिकाराला कायदेशीर महत्त्व प्राप्त झाले आहे.

**संशोधन पद्धती :–**
प्रस्तुत लघु शोधनिबंधात बौद्धिक संपदा अधिकार म्हणजे काय? त्याचे स्वरूप आणि प्रकार यासंबंधी माहितीचा अभ्यास करीत असतांना. संपूर्ण माहिती दुय्यम स्त्रोतांमधून घेतली आहे. यात विविध संदर्भ, पुस्तके, शासनाचे अहवाल, मासिके, इंटरनेट व वर्तमानपत्रे इत्यादीचा वापर दुय्यम स्त्रोत म्हणून केला आणि माहिती मिळविली आहे.

**बौद्धिक संपदा अधिकार म्हणजे काय?**
बौद्धिक संपदा ही संपत्तीच्या अनेक प्रकारांपैकी अलीकडील काळात झपाट्याने विकसित होणारा संपत्तीचा प्रकार होय. बौद्धिक म्हणजे बुद्धीची आणि संपदा म्हणजे संपत्ती म्हणजे बौद्धिक संपत्ती असे म्हणता येईल. संपत्ती म्हटले की आपल्याला आठवते सोने, नाणे, पैसे, घर, जमीन, जुमला, प्लॉट, गाडी इत्यादी परंतु माणसाची खरी संपत्ती त्याचे ज्ञान आहे. हे ज्ञान कमावण्यासाठी त्याला पैसे कमविण्याइतकेच कष्ट करावे लागतात. मानवाने बुद्धीचा वापर करून ज्ञान प्राप्त करणे यालाच बौद्धिक संपदा असे म्हटले जाते. नवनवीन पद्धतीचा उपयोग करून शोध घेण्याचा प्रयत्न करणे, शोध लावण्याची ही विशेष क्षमता म्हणजेच माणसाची बौद्धिक संपदा होय. जागतिक बौद्धिक संपदा संघटनाने बौद्धिक संपदेची व्यापक स्वरूपात व्याख्या केली आहे. यात साहित्य, कला, सर्व प्रकारचे मानवी शोध, शास्त्रीय शोध, औद्योगिक संकल्पचित्रे, व्यापारचिन्ह, सेवाचिन्ह, कलेचे सादरीकरण, भौगोलिक विशेषता, संगणकाची आज्ञावली, सूक्ष्म व जैविक संपदा, परंपरागत ज्ञान आदींच्या समावेश केला आहे.

थोडक्यात मानवी मनाच्या व बुद्धीच्या मदतीने निर्माण झालेली मालमत्ता अथवा माणसाची शोध घेण्याची (Discovery) आणि शोध लावण्याची (Invention) विशेष क्षमता म्हणजे ती त्याची बौद्धिक संपदा आहे. अशी संपत्ती धन किंवा मौल्यवान वस्तूच्या रूपात माणसाजवळ नसते. तर मनुष्य आपल्या बौद्धिक मेहनतीच्या परिणामावर किंवा फलावर अधिकार सांगत असतो व त्या आधारे त्याला भरपूर धन किंवा पैसा कमावता येऊ शकतो. उदा. वैज्ञानिक संशोधन, साहित्यिक आणि कलात्मक अविष्कार ही मानवाची बौद्धिक संपत्ती आहे.

**बौद्धिक संपदा अधिकाराचे स्वरूप :—**

एखाद्या व्यक्तीला एखादी छान अशी कल्पना सुचली व ती कल्पना खरंच मानव जातीच्या कल्याणासाठी वापरले जाऊ शकते. असे लक्षात आल्यास आणि त्या कल्पनेचे परिपूर्ण श्रेय हे कल्पना सुचवलेल्या व्यक्तीलाच मिळावे. म्हणून बौद्धिक संपदा अधिकार कायदा तयार करण्यात आला. भारतात बौद्धिक संपदा अधिकार कायदा 1970 रोजी पारित करण्यात आला. माणसाचे मन आणि बुद्धी यातून निर्माण झालेल्या बाबींविषयी कायदेशीर विचार करणे बौद्धिक संपत्तीत अभिप्रेत आहे. वाणिज्य घडामोडीत वापरता येणारे शोध तसेच चिन्ह, नावे, चित्रे, आकृत्या व संकल्प चित्रे याबरोबरच संगीत, साहित्य आणि कलाविषयक निर्मिती ही सर्व बौद्धिक संपदा मांनली जाते. कल्पना किंवा माहिती यांचे सादरीकरण करण्याचे स्वरूप किंवा पद्धत यांचे संबंधित असलेल्या उपवर्तक अधिकारांचा समुच्चय समुदाय म्हणजे बौद्धिक संपदा होय. थोडक्यात शारीरिक मेहनत अथवा श्रमातून निर्माण न होता भौतिक श्रमातून निर्माण होणाऱ्या मालमत्तेला बौद्धिक संपदा असे म्हणतात.

बौद्धिक संपदा संरक्षणाच्या क्षेत्रात साहित्यिक चोरी किंवा अवैध प्रकारे नक्कल केली गेल्याचा गंभीर धोका असतो. कारण त्यामुळे एखाद्या बौद्धिक उत्पादन आणि रचनाकर्त्याची भौतिकता आणि प्रामाणिकता यांना आर्थिक झळ पोहोचू शकते. म्हणूनच बौद्धिक संपत्तीची आणि त्याच्या मालकीच्या हिताचे संरक्षणासाठी उचित उपाय आणि संरक्षणतंत्राची आवश्यकता आहे. जागतिक बौद्धिक संपदा संघटने कडून (WIPO) बाबतची प्रकरणे हाताळण्यात येतात. WIPO ही संघटना संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य देशातील 1967 मध्ये केलेल्या करारान्वये जिनिव्हा येथे स्थापन करण्यात आली होती. वर्तमान आंतरराष्ट्रीय स्तरावर विश्व बौद्धिक संपदा संघटन आणि ट्रिप्स यांच्याकडे संरक्षणाची भूमिका बजावत आहे.

**बौद्धिक संपत्तीचे रक्षण :—**

बौद्धिक संपदेच्या रक्षणासाठी प्रत्येक देशात कायदे केल्याचे दिसून येते. आंतरराष्ट्रीय पातळीवर झालेल्या प्रयत्नातून बौद्धिक संपदा संघटना स्थापन करण्यात आली आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या सदस्य देशातील पुढाकाराने बौद्धिक संपत्तीच्या व्यापारासंबंधीच्या अधिकाराविषयी करारही करण्यात आला असून सदस्य देशांना आपापल्या देशातील बौद्धिक संपदेचे संरक्षण करणे शक्य झाले आहे. असे संरक्षण प्रामुख्याने खालील प्रकारे केले जाते

**बौद्धिक संपदा अधिकाराचे प्रकार :—**

**१) पेटंटः—** बौद्धिक संपदा अधिकारामध्ये पेटंट हा एक महत्त्वाचा अधिकार आहे. पेटंट मिळवण्यासाठी संशोधनकर्त्याने स्वतः शोध लावलेला असणे आवश्यक असते. सदर शोधात नाविन्य असले पाहिजे. तसेच शोधाची उपयोगीता असली पाहिजे तरच पेटंट मिळते. पेटंट या अधिकारान्वये जो कोणी एखाद्या वस्तूचा, तंत्रज्ञानाचा, प्रक्रियेचा किंवा सेवेचा शोध लावतो त्याचे पेटंट केल्यानंतर त्या वस्तूची कोणीही कॉपी करू नये. याबाबतीत कायदेशीर संरक्षण मिळते. जर कॉपी अथवा नकल करणाऱ्याने पेटंट धारकाची परवानगी घेऊन त्याची योग्य ते रॉयल्टी दिल्यास त्या वस्तूचे उत्पादन करू शकतो. त्यामुळे पेटंट धारकाला त्याच्या शोधाचा आर्थिक लाभ घेता येऊ शकतो. शोधकर्त्याने लावलेल्या शोधाची नोंद शासनाकडे करायला हवी. त्याशिवाय त्याला कायद्याचे फायदे घेता येत नाहीत. पेटंट केलेल्या वस्तूचा जर कोणी परवानागी शिवाय बेकायदेशीर वापर करीत असल्यास त्यावर कायदेशीर कारवाई केली जाते. सर्वसाधारणपणे वीस वर्षासाठी नवीन संशोधनावर संशोधकास पेटंट अधिकार मिळतात वीस वर्षाच्या काळानंतर हे संशोधन सर्वांसाठी खुले होते.

*पेटंटचे दोन प्रकार पडतात*

**अ) उत्पादन पेटंट :—** याचा अर्थ हा आहे की, कोणतीही व्यक्ती किंवा संस्था एखाद्या उत्पादनाची एकदम हुबेहूब नकल करू शकत नाही. म्हणजे दोन उत्पादनांची डिझाईन सारखी असू शकत नाही. हे अंतर उत्पादनाची पॅकिंग, नाव, रंग, आकार आणि चव इत्यादीचा असतो. हेच कारण आहे की, तुम्ही बाजारामध्ये कितीतरी प्रकारचे टूथपेस्ट बघितली असाल परंतु त्यामधील कोणत्याही दोन कंपनीचे उत्पादन एकदम एकसारखे बघितले नसाल. असे उत्पादन पेटंटमुळेच केले जाते.

**आ) प्रक्रिया पेटंट :—** याचा अर्थ असा की, कोणाचेही उत्पादित वस्तू त्या उद्योगाने ज्या प्रक्रियेने बनविली असेल त्याचे पेटंट झाले असल्यास त्याच पद्धतीने अथवा प्रक्रियेने दुसरा उद्योग वस्तूचे उत्पादन करू शकत नाही. 1970, 2003 व 2016 चे पेटंट अधिनियम भारतात लागू आहेत. पेटंटची नोंदणी झाल्यापासून ते वीस वर्षापर्यंत वैद्य राहतात पण त्यासाठी वार्षिक मूल्य अदा करावे लागते. भारतात पेटंट कायद्यान्वये जो एखाद्या शोधाच्या संदर्भात अगोदर नोंदणी करेल त्यालाच त्या शोधाचे पेटंट मिळते.

**२) ट्रेडमार्क व्यापारचिन्हे :—** एका माणसाची उत्पादकाची वस्तू किंवा सेवा इतरांपासून वेगळी ओळखता येणे सहज शक्य होईल. यासाठी चित्रात दाखविता येणारी एखादी खूण किंवा चिन्ह म्हणजे ट्रेडमार्क होय. ब्रँडनेम हा यासाठी लोकप्रिय शब्द आहे. यात वस्तूचा आकार, तिचे वेष्टन, शब्द, अक्षरे, आकडा, रंगसंगती चिन्ह यांचा समावेश होतो. ट्रेडमार्क मुळे वस्तू सहज ओळखली जाते. ट्रेडमार्क ही वस्तूची तिच्या दर्जाची मालकाची परंपरेची ओळख असते. ट्रेडमार्क देखील बौद्धिक संपदा अधिकार असून तिला कायद्याने संरक्षण दिलेले आहे. ट्रेडमार्क हा उत्पादकाच्या वस्तूच्या बाजारपेठेतील ख्यातीशी (Goodwill) निगडित असते.

**३) औद्योगिक संकल्पचित्र किंवा डिझाईन :—** ग्राहकांना एखादी वस्तू जशी त्याच्या उपयोगीतेवरून आवडते तसेच त्या वस्तूची डिझाईन, आकार, रंग, रूप तिचे बाह्य वेष्टन या बाबीही ग्राहकांना आकर्षित करतात. म्हणूनच प्रत्येक उत्पादक आपली वस्तू इतरांच्या वस्तू किंवा उत्पादनापेक्षा वेगळी दर्शविण्यासाठी विशिष्ट डिझाईन बाजारात आणत असतो. उदाहरण दुचाकी, चारचाकी वाहने, दूरदर्शन संच, वॉशिंग मशीन, मोबाईल, पंखे आधी असंख्य वेगवेगळ्या डिझाईनच्या वस्तू बाजारात आपण पाहतो. असे विशिष्ट डिझाईन संशोधनातून किंवा कल्पनाशक्तीतून निर्माण करणे बौद्धिक संपदा असते. अशा संपदेचा हक्क प्राप्त होण्यासाठी प्रथम 1972 मध्ये पेटंट्स अँड डिझाईन करण्यात आला. पुढे त्यात दुरुस्त्या करून 2001 मध्ये नवा कायदा करण्यात आला.

**४) भौगोलिक निर्देशक :—** भौगोलिक प्रदेशाच्या नावाने काही उत्पादने ओळखले जातात. उदाहरण रत्नागिरी हापूस, काश्मीरमधील केशर, दार्जिलिंग चहा, इत्यादी ग्राहकांना त्या नावाने उत्पादनाच्या गुणवत्तेची खात्रीपटते. म्हणूनच त्या आपल्या उत्पादनांना ती त्या प्रदेशातील नसतील तरी त्या प्रदेशाची जोडणारी नावे देऊन फायदा उठविण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे त्या प्रदेशाचे नाव बदनाम होऊ शकते. तसेच ग्राहकांनाही योग्य त्या दर्जाची उत्पादने मिळाल्यामुळे नुकसान होते. म्हणून जागतिक स्तरावर या दोन्ही गोष्टींना संरक्षण देण्याबाबत एकमत झाली.

एखादी वस्तू कोणत्या ठिकाणी उत्पादित झाली याला खूप महत्त्व असते. विशिष्ट भागात उत्पादित होणाऱ्या फळांची एक विशिष्ट चव असते. अनेक प्रकारच्या उत्पादनांना किती ज्या भौगोलिक प्रदेशात उत्पादित होतात त्या नावाने ओळखले जाते. अशा उत्पादनाला येतील भौगोलिक विशेषता लाभलेली असते व त्याविषयी ग्राहकांना विशेष आकर्षणही असते. एखादी वस्तू विशिष्ट ठिकाणी उत्पादित झालेली असेल तर ती उत्कृष्ट असते. उदाहरण हापूस किंवा राजापुरी आंबा, कोल्हापुरी मिसळ, पैठणी साडी, कोल्हापुरी चप्पल, नागपुरी संत्रा, कांचीपुरम साडी, आसाम किंवा दाजीलिंगाचा चहा, शेतमालाच्या बाबतीत भारतात ज्या 87 शेतमालावर जीआय नोंदणी झालेली आहे त्यातील 22 जी आय महाराष्ट्रातील आहेत. त्या ज्यामध्ये महाबळेश्वरची स्ट्रॉबेरी, साताऱ्याचा घेवडा, सोलापूरची डाळिंबे, जळगावची केळी, रत्नागिरीचे कोकम, लासलगावचे कांदे, नाशिकचे द्राक्ष, यांचा समावेश आहे. अशा वस्तूंच्या बाबतीत बऱ्याचदा त्या विशिष्ट ठिकाणी उत्पादित झालेल्या नसल्या तरी त्या तिथेच उत्पादित झालेल्या आहेत असे दर्शवून विकल्या जाण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा भौगोलिक विशेषताना संरक्षण देण्याच्या दृष्टीने जागतिक व्यापार संघटनेच्या जागतिक व्यापार विषयक बौद्धिक संपदा अधिकार ट्रिप्स कराराने 22 ते 24 कलमे समाविष्ट करण्यात आली व त्यानुसार जागतिक व्यापार संघटनेच्या सर्व सभासद देशांना भौगोलिक विशेषतांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने कायदा करणे आवश्यक करण्यात आला. त्याचाच भाग म्हणून भारतात एकूण 1999 मध्ये भौगोलिक विशेषतांना संरक्षण देण्यासाठी The Geographical Indications of Goods Acts कायदा केला गेला.

**५) कॉपीराईट किंवा लेखाधिकार**

एखाद्या लेखकांची लेखनकृती किंवा एखाद्या कलाकाराची कलाकृती हे त्याच्या कलेचे कल्पकतेचे बौद्धिक योगदानाचे खरे स्वरूप असते. त्या त्या लेखकाला त्यांची लेखन कृती, कलाकृती सुरक्षित राखण्याच्या दृष्टीने त्या लेखकाला कलाकाराला कायद्याने दिलेला अधिकार म्हणजे कॉपीराईट होय. कॉपीराईट प्रकाशित पुस्तकावर © असे चिन्ह आपण पाहतो ते कॉपीराईटचे अधिकार दर्शविते.

लेखक किंवा कलावंतांसाठी कॉपीराईट हा महत्त्वाचा कायदा निर्माण केलेला आहे. लेखक कलावंत आपली मेहनत करून काही कलाकृती समोर आणतात ती त्यांची बौद्धिक संपदा असते. तर सर्वसाधारण लोकांची जशी प्रॉपर्टी असते. तिच्यासाठी तो नेहमी जागृत असतो. जे सैनिक आपल्या बॉर्डरसाठी जीवाचे रान करतो प्रसंगी आपले प्राणाची परवा न करता इंच इंच भूमीसाठी बलिदान देतो. त्याचप्रमाणे लेखकांची कृती किंवा कलावंतांची कला ही त्याची एक प्रॉपर्टी असते. तिची जपणूक किंवा संरक्षण करणे हे त्याचे कर्तव्य असते. म्हणून हा अधिकार त्यांना मिळालेला आहे. सामान्यपणे कलाकाराचे कलाकृती विक्री इत्यादी बाबत विशिष्ट काळापुरता स्वलेखाधिकार्याचा हक्क कायद्याने निर्मात्याला दिलेला असतो. साधारणपणे लेखकाच्या किंवा कलाकारांच्या मृत्यूनंतर 60 वर्ष लेखाधिकाराची मुदत सर्वसामान्यपणे सर्व देशांनी आज मान्य केली आहे. भारतात 1957 चा कॉपीराईट कायदा अस्तित्वात आहे. या कायद्यातून 1983, 84, 92, 94 आणि 99 अशी पाच वेळा दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

**निष्कर्ष :—**

बौद्धिक संपत्ती अधिकारामुळे विविध प्रकारच्या बौद्धिक संपदांच्या निर्मितीस नवोपक्रमास, नवनवे शोध, कलाकृती यांच्या निर्मितीस प्रोत्साहन मिळाले आहे. व्यक्तीच्या कलेला, कल्पकतेला, लिखाणाला तसेच संशोधनाला चालना मिळाली आहे. बौद्धिक संपदा अधिकारांमुळे लेखकांना, कलाकारांना आर्थिक लाभ मिळविता येत आहेत. बौद्धिक संपदा अधिकार घेणाऱ्या व्यक्तीला संरक्षण मिळते तसेच कोणी आपल्या कल्पनेचा वापर करत असल्यास त्याचीही माहिती मिळते. बौद्धिक संपदा अधिकाराचा वापर करून देशातील तळागाळातील व्यक्तींना आपले संशोधन जगासमोर प्रदर्शित करण्याची संधी मिळते. बौद्धिक संपदा अधिकाराच्या संरक्षणासाठी कॉपीराईट, ट्रेडमार्क, औद्योगिक डिझाईन, भौगोलिक निर्देशांक, पेटंट इत्यादींना कायदेशीर महत्त्व प्राप्त झाले आहे.

**संदर्भ सूची :—**

१. आगलावे प्रदीप.,'संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्र', विद्या प्रकाशन,नागपूर
२. गोविलकर डॉ.वि.म.,'बौद्धिक संपदा अधिकार', डायमंड पब्लिकेशन,पुणे
३. नेमाडे डॉ.जयश्री, जाधव डॉ.सतीश,चव्हाण डॉ.हिरालाल., 'बौद्धिक संपदा हक्क स्वरूप आणि समस्या', प्रशांत पब्लिकेशन,जळगाव
४. नाईकवडे फारूक.,'बौद्धिक संपदा आणि भारत',दैनिक लोकसत्ता, ०७ डिसेंबर २०१8
५. https://www.ipindia.gov.in
६. https://copyright.gov.in
७. https://www.india.gov.in/website-intellectual-property-india?page=3